# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 April 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- गरीब, शेतकरी, युवा आणि महिला हे चार घटक केंद्रस्थानी ठेवत भाजपचा निवडणूक जाहीरनामा;काँग्रेसची टीका
- मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणासाठी येत्या पाच जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण-मनोज जरांगे पाटील यांचा इशारा
- जालना जिल्ह्यात अंबड इथं तीन भावंडांचा मृत्यू;पित्यास अटक

आणि

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी

****

गरीब, शेतकरी, युवा आणि महिला या चार घटकांना केंद्रस्थानी ठेवून, 'सब का साथ सब का विकास' या आधारे विविध आश्वासनं देणारा भारतीय जनता पक्षाचा निवडणूक जाहीरनामा, काल जाहीर झाला. गरीबांना शिधापत्रिकेवर मोफत अन्नधान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षं चालू ठेवणं, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी घरं बांधणं, ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत आय़ुष्मान भारत योजना पोहोचवणं, आदी संकल्प या जाहीरनाम्यातून व्यक्त केले आहेत. एक देश एक निवडणूक, एकसामायिक मतदारसंघ, आणि पेपरफुटीविरोधी कायदा करण्याचं आश्वासनही भाजपनं या जाहीरनाम्यातून दिलं आहे.

****

काँग्रेस पक्षानं भाजपच्या जाहीरनाम्यावर टीका केली आहे. निवडणुका आल्यानं भारतीय जनता पक्षाला शेतकरी, छोटे व्यापारी, तरुणांची आठवण झाल्याचं, पक्षाचे

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते काल नागपूर इथं पत्रकारांशी बोलत होते. समान नागरी कायद्याचं आश्वासन भाजपनं तर मागील निवडणुकीतही दिलं होतं, मग आतापर्यंत त्याची अंमलबजावणी का केली नाही, असा प्रश्न पटोले यांनी विचारला. गेल्या दोन निवडणूक जाहीरनाम्यातलेच मुद्दे भाजपच्या या जाहीरनाम्यात असल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

भंडारा-गोंदिया मतदार संघातले महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारासाठी, भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल सभा घेतली. यावेळी केलेल्या भाषणात, बाबासाहेबांच्या स्मृतीला अभिवादन करत, आरक्षणाला कोणालाही धक्का लावू देणार नाही, अशी ग्वाही शहा यांनी दिली. नागपूरचे महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार विकास ठाकरे यांच्या प्रचारासाठी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची सभा झाली. देशाचं संविधान आणि लोकशाही कायम राखण्यासाठी काँग्रेसची लढाई मनुवादी विचारधारेच्या विरोधात असल्याचं खर्गे यांनी सांगितलं.

मराठवाड्यात परभणी इथं महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्या प्रचारार्थ कृषी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी सभा घेतली.

एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी काल छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर पोहोचले, काल मुस्लिम धर्मगुरूंसोबत त्यांनी सविस्तर चर्चा केली. आज वैजापूर तसंच कन्नड इथं त्यांची सभा होणार आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून माढा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते-पाटील उद्या मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरणार आहेत. काल त्यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, शेकापचे जयंत पाटील, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

****

मराठा समाजाला लवकरात लवकर इतर मागास वर्ग-ओबीसीमधून आरक्षण नाही दिलं तर येत्या पाच जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. काल मुंबईत

चैत्यभूमी इथं ते वार्ताहरांशी बोतल होते. मराठा समाज विधानसभा निवडणुकीची तयारी करणार असल्याचंही जरांगे यांनी यावेळी सांगितलं.

****

जालना जिल्ह्यात अंबड तालुक्यातल्या डोमेगाव इथं विहिरीत तीन सख्ख्या भावंडांचे मृतदेह आढळून आले. सोहम, शिवामी आणि दीपाली अशी तिघांची नावं असून, त्याचं वय अनुक्रमे ११, आठ आणि सात वर्ष आहे. या प्रकरणी या मुलांचे वडील संतोष ताकवाले यांना काल रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगर इथून ताब्यात घेतल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेड जिल्ह्याच्या सीमेवर यवतमाळ जिल्ह्यात कवठा बाजार इथं एका महिलेसह दोन मुलींचा पैनगंगा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. पूजेचं निर्माल्य विसर्जित करण्यासाठी आलेल्या या तिघींपैकी, एक मुलगी पाय घसरुन पाण्यात पडली. तिला वाचवण्याच्या प्रयत्नात इतर दोघींचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला.

****

महसूल गुप्तचर संचालनालयानं काल नाशिक इथं वन्यजीवांच्या अवशेषांची तस्करी करणाऱ्याला अटक केली. त्याच्याकडून घोरपडीच्या ७८१ हात जोड्या तसंच साडे १९ किलोहून अधिक वजनाचे प्रवाळ जप्त करण्यात आले. नांदगाव रेल्वेस्थानक परिसरात सुमारे अर्धा किलोमीटर पाठलाग करून या तस्कराला अटक करण्यात आल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती काल सर्वत्र उत्साहात साजरी झाली.

मुंबईत दादरच्या चैत्यभूमीसह 'राजगृह' या बाबासाहेबांच्या निवासस्थानी नागरिकांनी मोठ्या संख्येनं दाखल होत महामानवाला अभिवादन केलं. हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात करण्यात आली. चैत्यभूमी परिसरात डॉक्टर आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत छायाचित्रांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. राज्यपाल रमेश बैस, तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या दीक्षाभूमी इथं बाबासाहेबांच्या अस्थिकलशाचं दर्शन घेत अभिवादन केलं. तर उपमुख्यमंत्री अजित

पवार यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही काल दीक्षाभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात डॉ. अरविंद गायकवाड यांचं, 'राष्ट्रनिर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर', या विषयावर व्याख्यान झालं. बाबासाहेबांनी घटना निर्मितीबरोबरच ऊर्जा, विद्युत, जल धोरण देखील ठरवल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि प्रबळ लोकशाही करीता मतदानाचं महत्त्व', या विषयावर ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांचं व्याख्यान झालं. लोकशाही समृद्ध आणि बळकट करण्यासाठी बाबासाहेबांनी सामान्य नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला, असं डोळे यांनी नमूद केलं.

छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्रात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पाहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं. भडकल गेट परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास, विविध सामाजिक राजकीय, शैक्षणिक संघटनेच्यावतीनं अभिवादन करण्यात आलं. महात्मा गांधी मिशन विद्यापीठात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धीस्ट स्टडीज या केंद्राचं काल लोकार्पण करण्यात आलं.

नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं.

जालना शहरातल्या मस्तगड इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच रांगा लागल्या होत्या. या ठिकाणी रक्तदान शिबिरासह आरोग्य तपासणी, फराळ वाटप आदी उपक्रम घेण्यात आले. शहरातून भव्य मिरवणूकही काढण्यात आली.

परभणीच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी नागरीकांची मोठी गर्दी केली होती. या ठिकाणी भिक्खू संघाच्या वतीनं सामूहिक महावंदना घेऊन पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं

तसंच समता दलानं फेरी काढून अभिवादन केलं. पुस्तक प्रदर्शनही या परिसरात भरवण्यात आलं होतं.

बीड इथं बाबासाहेबांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

धाराशिव इथं जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. जिल्ह्यात इतरत्रही नागरिकांनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती.

अकोल्याच्या अशोक वाटिका इथं भारतीय बौद्ध महासभेतर्फे अभिवादन करण्यात आलं. समता सैनिक दलातर्फे बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. बाबासाहेबांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष विधिज्ञ प्रकाश आंबेडकर यावेळी उपस्थित होते.

****

१४ एप्रिल हा दिवस ‘राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिन’ म्हणूनही पाळला जातो. १४ एप्रिल १९४४ ला मुंबई बंदरात `एस. एस. फोर्ट स्टिकीन` या बोटीमधील दारूगोळ्याच्या साठ्यानं पेट घेतला होता. त्यानंतर उसळलेल्या भीषण आगीवर नियंत्रण मिळवताना मुंबई अग्निशमन दलातल्या ६६ अधिकारी आणि सैनिकांना वीरगती प्राप्त झाली होती. अग्निशमन विभागातर्फे काल मुंबईमध्ये सेवा बजावताना आजवर वीरमरण मिळालेल्या अधिकारी आणि सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथले सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर तुळशी यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. महावितरणचे दक्षता अधिकारी प्रशांत तुळशी आणि दैनिक सामनाचे सहाय्यक संपादक गणेश तुळशी यांचे ते वडील होत. काल सायंकाळी त्यांच्या पार्थिव देहावर छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर आणि बीड जिल्ह्याच्या सीमेवरील लखमापूर इथं स्थापन करण्यात आलेल्या स्थिर निगराणी पथकाच्या तपासणी नाक्याला निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी पथकाकडून करण्यात येत असलेल्या कारवाईची माहिती जाणून घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या सरला स्नेह मंडळ संचलित बाल ज्ञान मंदिर शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच पार पडला. शाळेला या वर्षी साठ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त घेतलेल्या या मेळाव्यात शाळेच्या शिक्षकवृंदासह गेल्या चाळीस वर्षातले माजी विद्यार्थी सहभागी झाले होते.

****

बैसाखी – खालसा पंथ दिनानिमित्त काल नांदेड शहरातल्या गुरुद्वाऱ्यात धार्मिक कार्यक्रमांसोबतच बैसाखी महल्लाचा उत्सव साजरा करण्यात आला.

****